# प्रसिध्दीपत्रक

मार्च २०१६ मध्ये इयत्ता १० वी (माध्यमिक शालांत प्रमाणपत्र व समकक्ष) परिक्षेस प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांना व पालकांना कळविण्यात येते की, इयत्ता ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सन २०१६-१७ ही गतवर्षीप्रमाणेच ऑनलाईन होणार आहे, इयत्ता ११ वी ऑनलाईन प्रवेशाची माहिती पुस्तिका शिक्षण उपसंचालक पुणे कार्यालयाच्या **www.dydepune.com** व **http://pune.fyjc.org.in** या संकेतस्थळांवर पहावयास उपलब्ध आहे.

विद्यार्थ्यांना लॉगीन आय.डी. पासवर्ड व कॉलेज कोडसह नमुना प्रवेश अर्ज असणारी इयत्ता ११ वी ऑनालाईन प्रवेश प्रक्रियेच्या माहितीपुस्तिकेची छापील प्रत रु.१००/- देवुन पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील आपआपल्या माध्यमिक शाळेतून या क्षेत्राबाहेरील विद्यार्थ्यांना माहिती पुस्तिकेत दिलेल्या मार्गदर्शन केंद्रावरुन प्राप्त करुन घेता येतील. सदर इयत्ता ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेबाबतच्या माहितीपुस्तिकेच्या प्रती सर्व माध्यमिक शाळांना दि. ०९ मे २०१६ पासून उपलब्ध करुन दिल्या आहेत.

विद्यार्थ्यांचा प्रवेश अर्ज दोन भागामध्ये विभागलेला आहे. पहिल्या भागामध्ये विद्यार्थ्यांची वैयक्तिक माहिती भरावयाची असुन विद्यार्थ्यांना शिकत असलेल्या शाळेच्या मदतीने आपला इयत्ता ११ वी प्रवेशाच्या वैयक्तिक माहितीचा भाग **http://pune.fyjc.org.in** या संकेतस्थळावर ऑनलाईन भरुन घ्यावा. दुसरा भाग (पसंतीक्रम) हा विद्यार्थ्यांसाठी एस.एस.सी (महाराष्ट्र राज्य) मंडळाचा निकाल जाहिर झाल्यानंतर संकेतस्थळावर सुरु होणार आहे. तोपर्यंत विद्यार्थ्यांनी दुस-या भागाचा (पसंतीक्रमाचा) सराव माहितीपुस्तिकेतील नमुना प्रवेश अर्जाच्या मदतीने करावा.

सीबीएसई मंडळाच्या ज्या विद्यार्थ्यांना गुणाऐवजी ग्रेड दिले जातात अशा विद्यार्थ्यांच्या ग्रेडचे गुणामध्ये रुपांतर करुन घेण्याकरिता विद्यार्थ्यांनी / पालकांनी पुणे व पिंपरी पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील सी.बी.एस.ई. शाळांच्या विद्यार्थ्यांनी त्यांच्याच शाळेतुन रुपांतर करुन घ्यावे व या क्षेत्राबाहेरील विद्यार्थ्यांनी / पालकांना खालील केंद्रावर संपर्क साधावा.

१. आर एन पोद्दार स्कूल, सेंट ॲन्ड्रुज रोड, सांताक्रुझ (प.)
२. अेपीजे स्कुल , सेक्टर-१५ नेरुळ, नवी मुंबई ४०० ७०६.
३. डी ए व्ही पब्लिक स्कूल, प्लॉट नं-३४, सेक्टर नं-४८, नेरुळ नवी मुंबई ४०० ७०६.
४.डी.ए.व्ही. पब्लिक स्कुल , प्लॉट नं-११, सेक्टर नं-१०, ऐरोली, नवी मुंबई-४०० ७०८.

(रामचंद्र जाधव)
अध्यक्ष
इ.११ वी केंद्रीय प्रवेश नियंत्रण समिती
तथा
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग पुणे-१